**MHRG040058042025**

## <u>निशाणी क्र. ५ खालील आदेश</u>

**श्रीमती. प्रीती अविनाश नलावडे मार्फत**

**पिओए नितीन प्रकाश नलावडे**

**विरूध्द**

**तान्या विजय सिसोदिया व इतर**

**<u>दिनांक १७/०७/२०२६</u>**

वादीने सदरचा अर्ज हा तात्पुरता मनाई हुकुम मिळणेकरिता दाखल केला आहे व प्रार्थना केली की, प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकत त्रयस्त इसमांस हस्तांतरीत करू नये तसेच प्रतिवादी क्र. २ यांनी दावा मिळकतीचे शेअर सर्टीफीकेट प्रतिवादी क्र. १ अथवा अन्य कोणांसही तबदील करू नये असा मनाई हुकुम करणेत यावा.

२. वादीच्या अर्जाचे व त्यावर निशाणी क्र. २३ वर आलेल्या प्रतिवादीच्या म्हणण्याचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. २ न्यायालयात हजर झाले नाहीत व त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. वादीने निशाणी क्र. ४ प्रमाणे दाखल केलेलया दस्तावेजाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित झाले. त्यावर निष्कर्ष व कारणमिमांसा पुढीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादीस सकृतदर्शनी केस आहे का? | : | नकारार्थी |
| २. | अनुकुलतेचा कल वादीच्या लाभात आहे का? | : | नकारार्थी |
| ३. | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही न | : | नकारार्थी |

भरुन येणारे नुकसान होईल का?

४. आदेश काय? : अर्ज खारीज करण्यात येतो.

मुद्दे क्र. १ ते ३ करिता -

**वादीचे असे म्हणणे आहे की,**

४. कै. अविनाश प्रकाश नलावडे हे वादीचे पती होते. या लग्नसंबंधातुन त्यांना एक मुलगी आहे. कै. अविनाश प्रकाश नलावडे हे दिनांक ०३/०५/२०२५ रोजी मृत्यु पावले आहेत. प्रतिवादी क्र. १ ही डान्सबार मध्ये बारबाला म्हणुन काम करीत होती व आहे. हेरा बील्डींग मध्ये फलॅट नं. ४०७ क्षेत्र ४०.२५ चौ.मी. हे सदनिका कै. अविनाश प्रकाश नलावडे यांचे नावावर होती. सदर मिळकत ही दावा मिळकत आहे.

५. दावा मिळकत विकत घेण्याचा करार कै. अविनाश प्रकाश नलावडे व पर्सिपीना डेव्हलपर्स प्रा. लि. यांचेमध्ये दिनांक २०/१०/२०१८ रोजी करण्यात आलेला असुन तो दुयम निबंधक पनवेल क्र. ३ यांचेकडे नोंदविणेत आलेला आहे. दावा मिळकत विकत घेण्यासाठी मोबदल्याची रक्कम रुपये ४४,८१,४३०/- वादीने पर्सिपीना डेव्हलपर्स यास अदा केली होती.

६. कै. अविनाश प्रकाश नलावडे यांचे मालकीची मिरा रोड येथील शांतीवन, जी.सी.सी क्लब, जवळ जयकृष्णा दर्शन को.ऑप.हा.सोसायटी मधील डी वींग् मधील फलॅट नं. ५०१ ही सदनिका दिनांक ११/०६/२०१८ रोजीच्या ॲग्रीमेंट फॉर सेलने दिलीप व्होरा यांना विकली. त्या पोटी मिळालेल्या मोबदल्याचे रक्कमेमुळे कै. अविनाश प्रकाश नलावडे यांस कॅपीटल ग्रीन टॅक्स भरणे आवश्यक होते. त्यामुळे काही काळामध्ये अन्य स्थावर मिळकत विकत घेतल्यास तो कर भरणे टाळु शकते असा सल्ला त्याचे कर सल्लागार यांनी दिल्यामुळे दावा मिळकत कै. अविनाश प्रकाश नलावडे यांचे नावे विकत घेण्यात आली. दावा मिळकतीच्या मोबदल्याची रक्कम कै. अविनाश प्रकाश नलावडे यांचे बॅंक खात्यातुन अदा करण्यात आली होती. असे असले तरी वादी यांनी

वेळोवेळी या रक्कमा अविनाश यांचे खात्यात स्वतःचे बँक खात्यातुन पाठविल्या होत्या तर काही रक्कम रोख स्वरूपात अविनाश यास दिली होती. पती पतनी मधील सामंजस्यापोटी वादी व कै. अविनाश प्रकाश नलावडे यांनी त्याप्रमाणे व्यवहार केला.अशा प्रकारे दावा मिळकतीचा करार कै. अविनाश प्रकाश नलावडे यांचे नावे असला तरी प्रत्यक्ष दावा मिळकतीचे मोबदल्याचे संपुर्ण रक्कम वादी यांनी अदा केलेली होती. दावा मिळकत वादीचे मालकीची होती व आहे. दावा मिळकतीमध्ये कै. अविनाश प्रकाश नलावडे यांचा काहीही हक्क व हितसंबंध नाही. मिरा रोड येथील सदनिका विकुन मिळालेली रक्कम अविनाश यांनी त्याचे ऐरोली येथील राहते घराचे कर्ज फेडण्याकरीता वापरले होते.

७. कै. अविनाश प्रकाश नलावडे यांनी दिनांक ०३/०५/२०२५ रोजी आत्महत्या केली. अविनाश यांना गेल्या काही वर्षापासुन दारूचे व्यसन होते. वादी सप्टेंबर २०२१ पासुन त्यांचे मुलीसोबत अबुधाबी येथे कामाच्या निमित्ताने वास्तव्यास आहे. वादी अबुधाबी येथे राहायला गेलयानंतर अविनाश यांचे दारूचे सेवन वाढत गेले. ते कित्येकदा दिवसा देखील दारूच्या नशेत असत. अविनाश यास डान्सबार मध्ये देखील जायचा नाद होता. प्रतिवादी क्र. १ व अविनाश यांची तेथे ओळख झाली. अविनाश यास असलेल्या दारूच्या व्यसनाचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी क्र १ ने त्यांचेशी ओळख वाढविण्याचा प्रयत्न केला. हळुहळु प्रतिवादी क्र. १ ने त्यांचेशी जवळीक वाढवली. प्रतिवादी क्र. १ व त्यांचे कुटुंब गरीब असून प्रतिवादी क्र. १ वर घराची जबाबदारी असल्याचे सांगुन त्यांचेकउे सहानुभुती मिळविणेचा प्रयत्न केला. अविनाश यांचेकडे प्रतिवादी क्र. १ चे प्रति सहानुभुतीपुर्वक मत झाल्याचे पाहुन प्रतिवादी क्र. १ त्यांचेकडे मदत म्हणुन पैसे मागु लागले. अविनाश हा बरेचदा दारूच्या नशेत असलेने त्यांनी प्रतिवादी क्र. १ च्या सांगण्यावरून तीला व तीच्या कुटुंबाला वेळोवेळी पैसे दिले आहेत.

८. अविनाश यांचे मृत्युनंतर त्याचे नावे असलेल्या दावा मिळकतीस त्यांचे वारसांची नावाचीही नोंद व्हावी म्हणुन वादीने प्रतिवादी क्र. २ कडे अर्ज केला असता

त्यांनी दावा मिळकतीस प्रतिवादी क्र. १ चे नाव लावण्यासाठी प्रतिवादी क्र. १ ने त्यांचेकडे अर्ज केला असल्याचे व प्रतिवादी क्र.१ चे नावे नोंदणीकृत बक्षीसपत्र असल्याचे सांगितले, हे एकुन वादीला धक्का बसला. त्यानंतर नोंदणी कार्यालयात अधीक चौकशी केली असता दावा मिळकतीबाबत कै. अविनाश प्रकाश नलावडे यांनी प्रतिवादी क्र. १ चे लाभांत दिनांक २०/०१/२०२५ रोजी पनवेल येथील दुयम निबंधक कार्यालय पनवेल क्र. ३ यांचे कार्यालयात पवल-३-१३९/२०२५ या क्रमांकाकडे नोंदवीणेत आलेले बक्षीसपत्र केले असल्याचे माहिती वादीस मिळाली.

९. कै. अविनाश प्रकाश नलावडे यांचे प्रतिवादी क्र. १ शी कोणतेही नातेसंबंध नव्हते. प्रतिवादी क्र. १ केवळ कै. अविनाश प्रकाश नलावडे वरचेवर जात असलेल्या बारमधील बारबाला म्हणुन त्याचेशी परिचयाची होती. त्यामुळे प्रेमापोटी दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ यास देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. दावा मिळकतीच्या मोबदल्याची संपुर्ण रक्कम वादीने अदा केल्याने दावा मिळकतीचे खरे व योग्य मालक वादी होती व आहे. दावा मिळकत अन्य कोणासही खरेदीने, गहाणखताने अथवा बक्षीस म्हणुन तबदील करण्याचा कोणताही अधिकार कै. अविनाश प्रकाश नलावडे यांना नव्हता. अविनाश यांना दारूचे व्यसन होते. ते त्यांचे शेवटच्या काळात सतत नशेत असायचे. ते बेशुध्द होईपर्यंत दारू पित होते. नंतर त्यांना नैराश्याने देखील ग्रासले होते. त्यांचे या परिस्थितीचा फायदा घेवुन प्रतिवादी क्र. १ ने त्यांची फसवणुक करून सदर बक्षीसपत्रावर सहया घेतल्या आहेत. करिता, दिनांक २०/०१/२०२५ रोजीचे प्रतिवादी क्र. १ यांचे लाभांत नोंदणीकृत केलेले दावा मिळकतीचे बक्षीसपत्र मुळातच बेकायदेशीर आहे.

१०. दिनांक ०७/०८/२०२५ रोजी वादीने प्रतिवादीस वकीलांमार्फत नोटीस पाठवुन तथाकथीत बक्षीसपत्राचा खोटा असलेबाबतचा दस्त वादी यास लिहुन देवुन व नोंदणीकृत करून दयावा तसेच दावामिळकतीचा खुला, शांततामय ताबा वादी यास दयावा अशी मागणी केली आहे. सदर नोटीस प्रतिवादी क्र. १ यास प्राप्त झाली आहे. प्रतिवादी क्र. १ ने दिनांक २६/०८/२०२५ रोजी सदर नोटीसला वकीलांमार्फत खोटा

व खोडसळ जबाब पाठविला. प्रतिवादी क्र. १ ने नोटीसीतील मजकुर नाकारून नोटीसीत मागणी केलेल्या कृतीप्रमाणे वागण्यास नकार दिला.

११. प्रतिवादी क्र. १ याचे लाभांत दावा मिळकतीचे नोंदणीकृत बक्षीसपत्र असल्याचा त्याचप्रमाणे दाावामिळकत ताबेकब्जात असल्याचा गैरफायदा धेवुन प्रतिवादी क्र. १ दावामिळकत त्रयस्त इसमास घाईघाईने तबदील करण्याचा प्रयत्न करीत आहे. तसेच दावा मिळकतीचे शेअर सर्टीफीकेट प्रतिवादी क्र. १ चे नावे तबदील करण्यासाठी प्रतिवादी क्र. २ कडे अर्ज करून त्याचा पाठपुरावा करीत आहे. प्रतिवादी क्र. १ हीने दावा मिळकत त्रयस्त इसमास हस्तातरीत केल्यास दावा मिळकतीचा ताबा घेणे वादीस अशकय होईल व त्यामुळे दाव्याचा मुळ हेतुच नष्ट होईल. वादीचे लाभात प्रथमदर्शनी केस आहे. न्यायाचा तराजु देखील वादीचे बाजुने झुकला आहे. दावा मिळकतीत त्रयस्त इसमांचे हक्क हितसंबंध निर्माण झाल्यास वादीचे पैशाचे स्वरूपात न भरून येणारे नुकसान होईल. करिता, विनंती केली आहे की, दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी क्र. १ हिने स्वतः अथवा अखत्यारी यांचेमार्फत दावा मिळकत त्रयस्त इसमास दान, गहाण, बक्षीस अथवा विक्री अथवा कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करू नये तसेच दावा मिळकतीतील शेअर सर्टीफीकेट प्रतिवादी क्र. २ ने प्रतिवादी क्र. १ वा अन्य कोणासही तबदील करू नये असा मनाई हुकुम पारित करण्यात यावा.

१२. **प्रतिवादी क्र. १ चे म्हणणे आहे कि,**

मयत श्री. अविनाश नलावडे हे Accenture Solution Pvt Ltd या कंपनीमध्ये मोठ्या पदावर कामाला होते व त्यांना महिन्यास जवळपास रूपये १ लाख पगार होता. मयत श्री. अविनाश नलावडे हे आर्थिक दृष्ट्या खूप सधन होते. त्यांनी सदर दावा मिळकत हि स्वः कष्टातून खरेदी केलेली होती. सबब सदर मिळकतीवर मयत श्री. अविनाश नलावडे यांचा पूर्ण अधिकार होता. सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा देखील संपूर्ण अधिकार कायद्याप्रमाणे मयत श्री. अविनाश नलावडे यांनाच होता. सदर मिळकतीवर वादी यांचा कोणताही हक्क व अधिकार नव्हता व नाही.

१३. वादी यांचे विवाहबाह्य संबध होते. वादी यांचे विवाहबाह्य संबंध मयत श्री.

अविनाश नलावडे यांना समजल्यानंतर मयत श्री. अविनाश नलावडे यांनी दारू पिण्यास सुरुवात केली. एवढेच नव्हे तर वादी यांनी मयत श्री. अविनाश नलावडे यांच्यापासून विभक्त होण्यासाठी देखील मयत श्री. अविनाश नलावडे यांना खूप मानसिक त्रास दिला आहे. तसेच वादीच्या विवाह बाह्य संबंधाच्या त्रासाला कंटाळून मयत श्री. अविनाश नलावडे आणि वादी हे घटस्पोट देखील घेणार होते त्यासाठी वादी व मयत श्री. अविनाश नलावडे हे बांद्रा येथे जावून घटस्पोट कागदपत्रांवर देखील सह्या करून आले होते. मयत श्री. अविनाश नलावडे हे वादीच्या असलेल्या विवाहबाह्य संबंधामुळे खूप मानसिक त्रासामध्ये होते. यातच मयत श्री. अविनाश नलावडे आणि प्रतिवादी क्र १ यांची भेट झाली. प्रतिवादी क्र.१ यांनी मयत श्री. अविनाश नलावडे हे मानसिक त्रासात असताना त्यांना आधार दिला. यामध्येच प्रतिवादी १ व मयत श्री. अविनाश नलावडे यांचे प्रेमसंबंद निर्माण झाले व प्रतिवादी १ यांनी मयत श्री. अविनाश नलावडे यांना वादीच्या विवाह बाह्य संबंधाच्या त्रासातून मानसिकरित्या हळू हळू बाहरे काढले.

१४. प्रतिवादी क्र.१ ह्या मयत श्री. अविनाश नलावडे यांना भेटण्यापूर्वी हॉटेल मध्ये काम करायच्या परंतु ज्यावेळेपासून प्रतिवादी १ व मयत श्री. अविनाश नलावडे हे भेटले तेव्हापासून प्रतिवादी १ यांनी त्यांचा असलेले हॉटेलचे काम सोडून दिले होते. मयत श्री. अविनाश नलावडे यांनी प्रतिवादी क्र.१ यांची ओळख त्यांचे मित्रांसोबत देखील करून दिली होती. प्रतिवादी क्र.१ ह्या मयत श्री. अविनाश नलावडे यांच्याशी लिव्ह इन रिलेशनमध्ये राहून आपला सुखी संसार करत होते. ते लवकरच विवाह देखील करणार होते. सदर लिव्ह इन रिलेशनची माहिती हि वादी, मयत श्री. अविनाश नलावडे यांच्या घरच्यांना देखील होती. सदरच्या त्याच्या लिव्ह इन रिलेशनशिप मधून प्रतिवादी १ ह्या मयत श्री. अविनाश नलावडे यांच्यापासून गर्भवती राहिल्या आणि दिनांक ०१/०१/२०२६ रोजी प्रतिवादी १ आणि मयत श्री. अविनाश नलावडे यांना ओजस नावाचा मुलगा जन्माला आला.

१५. मयत श्री. अविनाश नलावडे यांनी ज्यादिवशी नोंदणीकृत बक्षीसपत्र

प्रतिवादी क्र. १ यांच्या लाभात लिहून दिले त्याचा दिवशी प्रतिवादी क्र.१ यांनी ते नोंदणीकृत बक्षीसपत्र स्वीकारले व सदर मिळकतीचा ताबा स्वःताकडे घेतला तसेच आजरोजी पर्यंत सदर घर मिळकतीचा ताबा हा प्रतिवादी १ यांच्याकडेच आहे. सदरचे नोंदणीकृत बक्षीसपत्र हे मयत श्री. अविनाश नलावडे यांनी पूर्ण शुद्धीत असताना, कोणत्याही दबावाला बळी न पडता, केवळ आणि केवळ प्रतिवादी क्र. १ यांच्यावर असलेल्या प्रेमापोटी सदरचा नोंदणीकृत दस्त हा सरकारी नोंदणी कार्यालयात सरकारी अधिकाऱ्यांच्या उपस्थित त्यांच्या समोर झालेला आहे. यामुळे सदर नोंदणीकृत दस्त हा खरा व बरोबर आहे व कायद्याला अभिप्रेत असा आहे. वादी यांना मयत श्री. अविनाश नलावडे यांनी करून दिलेल्या नोंदणीकृत बक्षीसपत्र रद्दबातल करून मागणेचा कोणताही हक्क व अधिकार कायद्याप्रमाणे नाही.

१६. प्रतिवादी क्र. १ दिनांक ०७/०५/२०२५ रोजी त्यांच्या भावाच्या लग्नासाठी त्यांचे गावी दिनांक २५/०४/२०२५ गेले होते. दरम्यानच्या काळात श्री. अविनाश नलावडे यांची तब्येत ठीक नसल्यामुळे ते त्यांची बहिण दीपा हिला घेऊन हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले होते त्यादरम्यान श्री. अविनाश नलावडे यांची व त्यांच्या भावाची खूप भांडण झाले होते. प्रतिवादी १ यांनी त्यांनतर श्री. अविनाश नलावडे यांना वारंवार फोनद्वारे संपर्क केला असता त्यांचा फोन स्वीच ऑफ येत होता. त्यामुळे प्रतिवादी १ यांनी ओळखीच्या ऑटो ड्रायव्हरला सोसायटीमध्ये पाठविले असता श्री. अविनाश नलावडे यांनी आत्महत्या केल्याचे त्यांना समजले. श्री. अविनाश नलावडे यांच्या जाण्यामुळे प्रतिवादी १ व त्यांच्या नवजात मुलाचे छत्र आजरोजी हरपले आहे व त्या खूप दुखात आहेत. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा केवळ आणि केवळ प्रतिवादी क्र १ यांची असलेली सदर दावा मिळकत हडप करण्याच्या उद्देशाने तसेच प्रतिवादी क्र १ यांना मानसिक त्रास देण्यासाठी आणि त्यांचेवर दबाव टाकून पैसे उकळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर दावा मिळकतीवर वादी यांचा कोणताही हक्क व अधिकार नाही. वादी यांना प्रतिवादी क्र. १ यांच्यावर वैयक्तिक राग आहे आणि म्हणूनच वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा हेतुपुरस्सरपणाने केवळ प्रतिवादी क्र १ यांना त्रास देण्याच्या उद्देशाने

दाखल केला आहे.

१७. वादीने त्यांच्या खात्यामधून मयत श्री. अविनाश नलावडे यांच्या खात्यामध्ये पाठविलेले शुल्लक रक्कम हे वादी हे न्यायालयाची दिशाभूल करून घर खरेदी करण्यास मदत केल्याबाबतचा खोटा खटाटोप करीत आहेत. केवळ वादी यांनी मयत श्री. अविनाश नलावडे यांच्या खात्यामध्ये काही शुल्लक रक्कम पाठविलेली आहे यावरून असे सिद्ध होत नाही की सदर मिळकत हि वादी यांच्या मोबदल्यामधून खरेदी केली आहे. सबब वादी यांचा सदर दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार नाही. वादी यांनी सदर दावा मिळतीमध्ये त्यांचे तथाकथित असलेले हक्क व अधिकार श्री. अविनाश नलावडे हे जिवंत असे पर्यंत कधीही मागितलेले नाही. वादी यांनी सदरचा दावा हा श्री. अविनाश नलावडे मयत झाल्यानंतरच मुद्दामहून केवळ प्रतिवादी क्र.१ यांची दावा मिळकत हडप करण्याच्या दृष्ट हेतूने दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांच्या नावे सदर मिळकतीचे लाईट बिल देखील आहे आणि सदर मिळकतीचे लाईट बिल देखील प्रतिवादी क्र १ हेच अदा करतात. तसेच सदर दावा मिळकतीचे मेंटेनन्स देखील प्रतिवादी क्र १ ह्याच अदा करतात. प्रस्तुतचे नोंदणीकृत बक्षिसपत्र झाल्या दिवसापासून सदर मिळकतीचा खुला व शांततामय ताबा हा प्रतिवादी क्र १ यांच्याकडेच आहे. सबब प्रस्तुतच्या दावा मिळतीमध्ये प्रतिवादी क्र १ यांचाच हक्क व अधिकार आहे. वादी यांनी त्यांचे दीर श्री. नितीन प्रकाश नलावडे यान दिनांक १०/७/२०२५ रोजी नोंदणीकृत कुलमुखत्यारपत्र न्यायालयीन कामासाठी दिलेले आहे परंतु प्रत्यक्षात त्यांच्याच कथनातून वादी यांना दावा दाखल करण्याचे कारण ३०/०८/२०२५ रोजी घडल्याचे नमूद केले आहे. सबब दावा दाखल करण्याचे संयुक्तिक कारण घडण्याचे पूर्वीच न्यायालयीन कामकाजासाठी कुलमुखत्यारपत्र देणे हे कायद्यात व तर्क बुद्धीला न-पटणारे आहे. वादीस सकृतदर्शनी केस नाही. करिता वादीचा अर्ज नामंजुर करावा.

१८. वादीचे म्हणणे आहे की, अविनाश प्रकाश नलावडे हे वादीचे पती होते. ते दिनांक ०३/०५/२०२५ रोजी मृत्यु पावले. वादमिळकत ही अविनाश नलावडे यांनी पर्सीपीना डेव्हलपर्स कडुन दिनांक २०/१०/२०१८ च्या नोंदणीकृत कराराने विकत

घेतली आहे. दावा मिळक्त विकत घेण्यासाठी मोबदल्याची रक्कम रूपये ४४,८१,४३०/- वादीने पर्सीपीना डेव्हलपर्स यांना अदा केली होती. दावा मिळकतीचा करार जरी अविनाश यांचे नावे असला तरी दावा मिळकत वादीचे मालकीची होती व आहे. दावा मिळकतीमध्ये कै. अविनाश यांचा काही हक्क व हितसंबंध नाही. त्यामुळे कै. अविनाश यांना दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ यांचे नावे हस्तांतरीत करण्यासाठी कोणताही अधिकार नव्हता. त्यामुळे कै. अविनाश यांनी दिनांक २०/०१/२०२५ रोजीचे प्रतिवादी क्र. १ चे नावे केलेले नोंदणीकृत बक्षीसपत्र हे बेकायदीशीर आहे.

१९. प्रतिवादी क्र. १ चे म्हणणे आहे की, कै. अविनाश हे वाद मिळकतीचे मालक होते. वादमिळकत त्यांनी स्वकष्टाने खरेदी केली होती. अविनाश नलावडे यांनी प्रेमापोटी प्रतिवादी क्र.१ ला वादमिळकत बक्षीसपत्राने हस्तांतरीत केली आहे व प्रतिवादी क्र. १ ही वादमिळकतची कायदेशीर मालक आहे व वादमिळकत त्याचे ताब्यात आहे.

२०. दाखल केलेल्या दस्तावेजाचे अवलोकन केले असता, अविनाश प्रकाश नलावडे हे दिनांक ०३/०५/२०२५ रोजी मयत झाले आहेत. दिनांक २०/१०/२०१८ रोजीच्या करारनाम्यावरून असे दिसुन येते की, वादमिळकत ही अविनाश प्रकाश नलावडे यांनी पर्सीपीना डेव्हलपर्स कडुन नोंदणीकृत करारनाम्याने विकत घेतली होती. ॲक्सीस बॅंकेचा अविनाश नलावडे यांचा खातेउतारा यावरून असे दिसुन येते की, वादी यांनी त्यांचे खात्यामध्ये दिनांक २४/१०/२०२२ रोजी रूपये २०,४०,०००/- ट्रान्सफर केले आहेत. दिनांक २०/०१/२०२५ रोजीच्या नोंदणीकृत बक्षीसपत्रावरून असे दिसुन येते की, अविनाश् नलावडे यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे नावे वादमिळकतीचे बक्षीसपत्र केले आहे. दिनांक ०७/०८/२०२५ च्या नोटीसीवरून वादीने प्रतिवादी यांना वकीलांमार्फत नोटीस पाठवुन सदरचे बक्षीसपत्र बेकायदेशीर असलेबाबत कळविले आहे. दिनांक २६/०८/२०२५ च्या नोटीसीवरून आसे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. २ ने वादीच्या नोटीसीचे उत्तर दिले आहे.

२१. वादमिळकतीचे खरेदीखत हे मयत अविनाश नलावडे यांचे नावे आहे.

वादीने जरी वादमिळकत घेण्यासाठी अविनाश यांना काही पैसे दिले असतील परंतु वादमिळकतीचे खरेदीखत हे कै. अविनाश यांचे नावे असल्याने अविनाश हे वादमिळकतीचे कायदेशीर मालक होते. वादमिळकतीचा विक्री करारनामा झाल्याचे दिनांकापासुन म्हणजे दिनांक २०/१०/२०१८ ते दिनांक ०३/०५/२०२० पर्यंत म्हणजे अविनाश नलावडे जिवंत असेपर्यंत वादीने वादमिळकत स्वतःच्या नावे हस्तांतरीत करून घेतली नाही. अविनाश हे वादमिळकतीचे कायदेशीर मालक असल्याने त्यांना वाद मिळकतीचा कायदेशीर विल्हेवाट करण्याचा अधिकार होता. कै. अविनाश हे वाद मिळकतीचे मालक असल्याने त्यांनी वादमिळकत प्रतिवादी क्र. १ यांना दिनांक २०/०१/२०२५ रोजीचे नोंदणीकृत बक्षीसपत्राने हस्तांतरीत केली आहे. दिनांक २०/०१/२०२५ रोजीच्या बक्षीसपत्राने प्रतिवादी क्र. १ ही वादमिळकतीची कायदेशीर मालक आहे. वादीस सकृतदर्शनी केस नाही, अनुकुलतेचा कल वादीच्या लाभात नाही व तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. करिता, मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

२२. प्रतिवादी क्र. १ यांनी (२०२४) १९ एस सी सी १२१ **एन. थाजुद्दीन वि. तामीळनाऊ खादी ॲण्ड व्हीलेज इंडस्ट्रीज** हया न्यायनिवाडयाचा आधार घेतला आहे. सदर न्यायनिवाडा हा तात्पुरता मनाई हुकुमाबाबत नसले कारणाने या केसला लागु होत नाही.

वरील दिलेल्या कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज निशाणी क्र. ५ खारीज करणेत येत आहे.

RAJSHRI MANOHAR GANVIR
Digitally signed by RAJSHRI MANOHAR GANVIR
Date: 2026.07.17 18:29:44 +0530

पनवेल, (राजश्री म. गणवीर)

दिनांक १७/०७/२०२६ ४थे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,पनवेल